# स्वप्न वास्तवात उतरवण्यासाठी कष्ट करणे गरजेचे आहे :- मा. इंद्रजित देशमुख
# वाय.सी. मध्ये प्रश्नमंजुषा स्पर्धेचा उद्‌घाटन समारंभ संपन्न

**सातारा :-** प्रशासकीय अधिकारी होण्यासाठी आपली निवड चांगली असावी लागते. प्रत्येकाने आपल्या क्षमतेची तपासणी केली पाहिजे व आपल्या बुध्दीमत्तेचा वापर नक्की कशासाठी करायचा हे ठरविले पाहिजे. आपले जर ॲकॅडमीक करीअर चांगले असेल तर भविष्यात यश मिळते परंतू ॲकॅडमिक करिअर बरोबर प्रोफेशनल करिअर सुध्दा गरजेचे आहे. असे प्रतिपादन मा. इंद्रजित देशमुख माजी अतिरिक्त कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी केले. ते येथील यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स या महाविद्यालयात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील राज्यस्तरीय आंतरमाहाविद्यालयीन प्रश्नमंजूषा स्पर्धेच्या उद्‌घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना मा.इंद्रजित देशमुख म्हणाले जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर निवड कशी आहे यावर भविष्यात अवलंबून असते. कधी कधी आपल्या आपडीनिवडी बाजूला ठेवाव्या लागतात काही गोष्टींचा त्याग करावा लागतो. आयुष्यात आपली निवड चुकल्यानंतर परत निवडीची संधीही आपल्याकडेच असते. आणि स्वप्न वास्तवात उतरवण्यासाठी कष्ट करणे गरजेचे आहे आणि त्याचेच ह्रदय मोठे असते व दुस-याचे जीवन समृध्द करताना आपले जीवन समृध्द करणे यातच जगण्याचा अर्थ आहे. कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलनाने झाली.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.जी.कानडे यांनी केले. प्रास्ताविकामध्ये त्यांनी महाविद्यालयाच्या वाटचालीचा आढावा दिला व रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी वर्षाच्या पदार्पणात या राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेचे हे १४ वे वर्ष असून कर्मवीर विद्याप्रबोधिनी ही रयत शिक्षण संस्थेची ॲकॅडमिक बिंग म्हणून ओळखली जाते व त्यांच्याच संयुक्त विद्यमाने दरवर्षी प्रश्नमंजुषा स्पर्धा महाविद्यालयात पार पडते असेही ते म्हणाले.

प्रास्ताविकानंतर प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या चेअरमन प्रा.सौ.पी.व्ही.जंगम यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन प्राचार्य डॉ.भाऊसाहेब कराळे होते.

या प्रसंगी कर्मवीर विद्याप्रबोधिनीचे कार्यकारी संचालक प्राचार्य आर.के.शिंदे, ओ.एस.डी. शहाजी डोंगरे, आर.आय.आर.डी चे डायरेक्टर डॉ.यु. पी.मुळीक, प्रसिध्द सिने अभिनेते समृध्दी जाधव, सर्व समिती सदस्य,शिक्षक व विविध महाविद्यालयातून प्रश्नमंजुषा स्पर्धेसाठी आलेले विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते सुत्रसंचालन प्रा.डॉ. मनिषा पाटील, व प्रतिमा पवार यांनी केले, आभार प्रा. बिपिन शिंदे यांनी मानले.

---

जा.क्र. /२०१९-२०. दि. १७ /०१/२०१९

प्रती,
मा. संपादक,
दैनिक ------
सातारा

महोदय,

सदरची बातमी आपल्या सुप्रसिध्द दैनिकात प्रसिध्द करणेविषयी विनंती आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

प्राचार्य,
यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स,
सातारा